**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १८०/२०२४ मधील नि.क्र. १५ वरील आदेश</u>**

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत विहित वेळेत न दिल्यामुळे झालेला विलंब माफ करून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी अर्जाचे पृष्टयर्थ स्वतःचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.१६ वर दाखल केले आहे.

०२. वादीने प्रस्तुतचा दावा रक्कम वसुलीसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी असे कथन करतो की, प्रस्तुत दाव्याचे समंस प्रतिवादी यांना रुजू झाले आहे. त्यानंतर प्रतिवादी वकीलांमार्फत हजर झाले आहेत. वास्तविक पाहता प्रतिवादी यांना महत्वाच्या कामानिमीत्त परजिल्हयात जावे लागल्याने त्यांना हजर राहून कैफियत देता आली नाही. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल होणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी जाणिवपूर्वक उशिर केला नाही. उशिराबाबतचे दिलेले कारण खरे व प्रामाणिकपणाचे आहे. प्रतिवादी यांना या दाव्यामध्ये कैफियत दाखल करणे अत्यंत आवश्यक आहे. तसे झाले नाही तर प्रतिवादी यांचे न्यायहक्कावर मोठी गदा येऊन त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी याने त्यास त्याची कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून त्याची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी अशी विनंती केली आहे.

०३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करून अर्जावर आक्षेप नोंदविला आहे. वादी असे कथन करतात की, प्रतिवादीचा अर्ज कायदेशीर नाही. अर्जास योग्य कारण नाही. करीता प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा. अशी वादी यांनी विनंती केली आहे.

०४. प्रस्तुत अर्ज व वादी यांचे म्हणणे वाचले. दोन्ही बाजूच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा रक्कम वसुलीसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढणेसाठी प्रतिवादी यास कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करणे उचित ठरेल. माझ्या मते, प्रतिवादी यास त्याची कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ न केल्यास त्यास त्याची कैफियत अभिलेखावर दाखल करून त्याचे बाजूचा पुरावा अभिलेखावर दाखल करणे शक्य ठरणार नाही. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज खर्च रू.३००/- सह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी उपरोक्त नमूद खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर त्याची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

दि.२५.०७.२०२५

(एस. पी. सैय्यद)
२रे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर.वडूज.